# दुसऱ्या सायक्लोथॉन - पुणे ते रत्नागिरीसाठी पुण्यातील रुग्णालयांचे सहकार्य

● सातारा । प्रतिनिधी

मुकुल माधव फाऊंडेशनने (एमएमएफ) फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या सहकार्याने व बायसिकल एंजेल्स या ना-नफा तत्त्वावरील सामाजिक उपक्रमासह पुणे ते रत्नागिरी या सायक्लॉथॉनचे आयोजन केले असून समाजातील दुर्बल घटकांना मदत करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. ८ डिसेंबर २०१५ रोजी सुरू होऊन ते १२ डिसेंबर २०१५ पर्यंत ते चालेल. दोन व्यावसायिक सायकलपटू या अनोख्या कार्यक्रमात उपस्थित असतील. हा कार्यक्रम मुकुल माधव फाऊंडेशनचा एक उपक्रम असून फिनोलेक्स पाईपने आपल्या सीएसआर उपक्रमांतर्गत तो प्रायोजित केला आहे आणि अशोक लेलँड हे याचे ट्रॅव्हल पार्टनर असणार आहेत. या पाच दिवसांच्या कार्यक्रमात अनेक कार्यक्रम होणार असून त्यात बायसिकल एंजेलसच्या वतीने गरजू व्यक्तींना उपजीविकेसाठीच्या सायकलींचे वाटप करण्यात येणार आहे. फिनोलेक्स इंडस्ट्रीजच्या सहकार्याने एमएमएफ शिरवळ, उंब्रज, कोकरूड आणि पाली येथील चार जिल्हा परिषद शाळांमध्ये वैद्यकीय शिबिरांचे आयोजन करणार आहे. मंगळवारी ८ डिसेंबर ला सकाळी १० वाजता शिरवळ येथील जिल्हा परिषद शाळेत आरोग्य तपासणी शिबिरामध्ये ४१५ मुलांची तपासणी करण्यात येणार आहे. हे शिबिर संध्याकाळी ४.४५ ला संपणार आहे. दुस-या दिवशी बुधवारी ९ डिसेंबर रोजी १० वाजता उंब्रज येथील जिल्हा परिषद शाळेत आरोग्य तपासणी शिबिरामध्ये ६९६ मुलांची तपासणी करण्यात येणार आहे. हे शिबिर संध्याकाळी ५ वाजता संपणार आहे. तिस्या दिवशी गुरुवारी १० डिसेंबरला सकाळी १० ते सायंकाळी ४ या वेळेत कोकरूड येथील जिल्हा परिषद शाळेत आरोग्य तपासणी शिबिरामध्ये २६० मुलांची तपासणी करण्यात येणार आहे. चौथ्या आणि पाचव्या दिवशी ११ व १२ डिसेंबरला सकाळी १० ते सायंकाळी ५.३० या वेळेत पाली येथील जिल्हा परिषद शाळेत आरोग्य तपासणी शिबिरामध्ये १८०० मुलांची तपासणी करण्यात येणार आहे. आरोग्य शिबिरामध्ये २० हून अधिक डॉक्टरांचे पथक सामील होणार असून त्यात केईएम इस्पितळातील पेडियाट्रीक विभागाचे पथक, भारती हॉस्पिटलच्या ऑडियोलॉजी, स्पीच व डेंटल विभागाचे पथक आणि एच. व्ही. देसाई आय हॉस्पिटलमधील नेत्ररोग विभागाचे पथक यांचा समावेश आहे. मुकुल माधव फाऊंडेशनच्या संनियंत्रणाखाली असलेल्या ३१७१ मुलांची यावेळी हे डॉक्टर तपासणी करणार आहेत. तसेच आरोग्य शिबिरात सहभागी होणा-या प्रत्येक नवीन विद्यार्थ्यांनी नाव संनियंत्रणासाठीच्या यादीत समाविष्ट करण्यात येणार आहे आणि नंतर त्यांच्या आरोग्याबाबत त्यांचे पर्यवेक्षण करण्यात येईल. जानेवारी २०१६ पर्यंत फिनोलेक्स इंडस्ट्रीजच्या साहाय्याने एमएमएफ ही विनंती पूर्ण करेल आणि १०० विशेष मुले या खुर्च्या वापरून शाळेत नियमित उपस्थित राहू शकतील, असे त्या म्हणाल्या. वंचितांना वितरित केलेल्या सायकलींच्या माध्यमातून त्यांना उपजीविका मिळण्याच्या संधी वाढविण्यास मदत करून त्यांचे सशक्तीकरण करणे, हा या प्रकल्पामागचा दृष्टिकोन आहे.